प्रेसनोट                                                         दिनांक ०९/०६/२०२५

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, संचलन व सुव्यवस्था विभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, वसई (पुर्व) जि. पालघर येथील लोकसेवक श्री. कल्पेश जयवंत पाटील, वय – ५३ वर्षे, पद – उप व्यवस्थापक (वित्त व लेखा), वर्ग – २ यांचेविरुध्द लाचलुचपत विभागाकडून सापळा कारवाई झालेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| स्टेशन डायरी नोद क्रमांक | :– | माणिकपुर पोलीस स्टेशन, वसई ठाणे दैनंदिनी क्रमांक ०३१/२०२५, वेळ २०:०६ दिनांक ०९/०६/२०२६ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | श्री. कल्पेश जयवंत पाटील, वय – ५३ वर्षे, पद – उप व्यवस्थापक (वित्त व लेखा), वर्ग – २, नेमणूक – कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, संचलन व सुव्यवस्था विभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, वसई (पुर्व) जि.पालघर |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ३५,०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | ३०,०००/– रूपये (तडजोडीअंती) |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांचे कंपनीचे नावे असलेले विद्युत मीटर सन २०१० पासून बंद करण्यात आले होते. सदर विद्युत मीटर बिलाचे थकीत असलेली २,०६,९२०/– रूपये रक्कमेमधून बिलाची रक्कम कमी करण्यासाठी लोकसेवक श्री.कल्पेश पाटील हे स्वत:करीता ३५,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असलेबाबत दिनांक ०९/०६/२०२५ रोजी तक्रार करण्यात आली होती.<br>त्यानुसार आज रोजी तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडे लोकसेवक यांनी विद्युत मीटर बिलाचे थकीत असलेली २,०६,९२०/– रूपये रक्कमे ऐवजी एकुण ६०,०००/– रूपये थकित बिलाची रक्कम भरणा करण्यास सांगून ३०,०००/– रु. स्वत:साठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार केलेल्या सापळा कारवाई दम्यान लोकसेवक श्री. कल्पेश जयवंत पाटील, वय – ५३ वर्षे, पद – उप व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांनी तक्रारदार यांचेकडून ३०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारली असता, दिनांक ०९/०६/२०२५ रोजी १७:३० वा. लोकसेवक यांना लाचेच्या रक्कमेसहीत रंगेहात ताब्यात घेण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम – ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप्स् क्रमांक – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते ठाणे

( सचिन मोरे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.